म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २१५९

शब्दसूर

दुर्मिळ - ४४८

# प्रस्तावना

हें काव्य कवींनीं मला दोन वर्षांपूर्वींच दाखविलें होतें; तेव्हां तें मला फार आवडलें. आणि त्यांच्या मागणीवरून त्याविषयींचा मीं आपला अभिप्रायही त्यांस लिहून दिला. ह्या संबंधानें प्रथमतः मला येवढेंच सांगावयाचें आहे कीं, हें काव्य जसें मला चांगलें वाटलें तसेंच तें हि० ट्रान्सलेशन सोसायटी या विद्वत्सभेस पसंत पडलें आहे; हें मला एक मोठें बक्षीसच वाटत आहे. रा. रा. जोशी यांची वाणी गोड आहे, भाषा सरळ आहे, शब्दयोजना आणि वाक्यरचना शुद्ध आहे. प्रसंगाच्या वर्णनाची शैली आमच्या मध्यकालीन कवींच्या शैलीजवळजवळ आहे. आणि आपल्या मनांतले विचार शब्दस्वरूपानें वाङ्मयांत स्पष्ट कसे रेखाटावे हें त्यांस चांगलें साधलें आहे. काव्य वाचतेवेळेस अर्थाचा संशय कधींही पडत नाहीं, आणि शब्दांची ओढाताण करावी लागत नाहीं; हें यांत एक विशेष आहे.

काव्याचें कथानक अगदीं साधें आणि सुबोध आहे. म्हणजे भीम या नांवाच्या एका वाचाळ आणि भ्याड मनुष्यानें आपल्या शौर्याच्या लटक्याच बढाया मारून राजा शिवसिंह याच्या दरबारांत मोठी वाहवा मिळविली; परंतु प्रसंग आला त्यावेळीं द्रव्याच्या आणि अधिकाराच्या लोभानें आपल्या अन्नदात्याजवळ तो बेइमान होऊन अंतर्गृहांत लपून राहिला; व आपली धर्मपत्नि मुक्ताबाई इजला पुरुषवेषानें लढाईस पाठवून शेवटीं आपला उभयतांचाही फार भयंकर रीतीनें त्यानें नाश करून घेतला. या प्रमाणें कथानक असोन त्यांतील

नायकाच्या वर्तनावरून '*शब्दशूर' असें अन्वर्थक नांव या काव्यास दिलें आहे. यांतील पात्रांचीं भाषणें त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें जशीं असावींत तशीं आहेत. तेणेंकरून रसाविर्भाव चांगला उतरला आहे. त्यांतील उतारे देण्यास येथें फारशी सवड नाहीं, तरी मासल्याकरितां एक दोन देतों.

काव्यांतील नायिका मुक्ता हिनें आपल्या पतीस समरांगणास जाण्यास उत्तेजन देण्याकरितां ह्मटलें आहे:—

" वीरें पाय न घ्यावा मागें केव्हांहि युद्धकाजातें
जावें नाचत हांसत माहेरा जेंवि कन्यका जाते.
अक्षयि निजगुण गाणें समजा पुरुषार्थ यांत कांहीं न
व्हा रणसिद्ध करा पण 'नृपकाजीं आजि देह वाहीन'.
नृप अंश ईश्वराचा सेवावें त्याजला मनोभावें
त्या सुखवाया काया कष्टवुनी सुप्रजेंत शोभावें ". इ०

यांत किती राजनिष्ठा आहे पहा ! त्याप्रमाणेंच तिनें लढाईस जातांना वाटेंत एका देवलयांत जाऊन देवाजवळ वरप्रसाद मागितला त्याचें वर्णन कवीनें केलें आहे, तें असें:—

" जाउनि आंत सुचरिता करि तारण व्हावयास्तव स्तवन
'हे प्रभुराया धर या निष्ठुरता दीन दासिवर लव न.
पतिरक्षणार्थ जातें नरवेषें समर मी करायासी
कवणा कळों न दे हें कुशलस्थित ठेव नाथरायासी.
लोभें मंत्रिपदाच्या नीचांतें वर्म दाविता झाला
दुष्कर्म घोर जरि तें दीन दयाळा करीं क्षमा त्याला.
जरि येवढें न घडलें पडलें दुर्दैव आमुचें आड
तर या अभागिनीची रणकुंडाग्नींत आहुती पाड' ".

या तिच्या शब्दांत पतीच्या संरक्षणाची काळजी आणि स्वीकृत कार्यांत यश न आलें तर मरून जाण्याची इच्छा या दोन गोष्टी प्रमुखत्वानें प्रकट झाल्या आहेत. ह्यांत पातिव्रत्त्याची सीमा झाली आहे. पंतांनीं जें ह्मटलें आहे कीं 'वर हि वरायासि पाहिजे समज' तें हेंच.

---

* या काव्याचें नांव 'वाग्शूर' असें ठेवण्याबद्दल डे. व्ह. ट्रा. सोसायटीचे मंडळीनें योग्य सूचना केली आहे. सुदैवानें या पुस्तकाच्या द्वितीयावृत्तीचा प्रसंग आल्यास मंडळीचे सूचनेप्रमाणे फरक करण्यांत येईल. लेखक.

काव्याच्या शेवटीं समरांगणाचें वर्णन कवीनें केलें आहे त्यांत असें आहे:—

“ नरमांसशोणिताचें प्रोक्षण जैसें तया स्थलीं केलें
त्यांतचि जागोजागीं आढळती प्रेतपुंज पडलेले.
पद एकचि कोणाचें कोणाचे हस्त दोनही तुटले
अरिकृत शस्त्राघातें कितिकांचे शिरकमण्डलू फुटले !
कोणाच्या शिरिं बैसुनि फोडिति खल काक चंचुनें डोळे
फाडिति हृदय कुणाचें मांसाशनलुब्ध लांडगे कोल्हे.
आरक्त आंतड्यांच्या माळा ज्यांच्या गळीं अशीं श्वानें
भांडत नाचत सुटती, याचक देखुनि जशीं महादानें.
वनिं जेंवि शुष्क काष्ठें तैसा अस्थिप्रसार सर्वत्र
पद एकहि ठेवाया स्थल निर्मल आढळेचिना तत्र”. ३०

या आर्यांमध्यें रणांगणाचें चित्र हुबेहूब काढिलें आहे. तें वाचलें ह्मणजे अंगावर रोमांच उभे राहतात. या नंतर विश्वासघातकी, फितुरी, भीमास अनुलक्षून शिवसिंह राजानें ह्मटलें आहे:—

“ भुललास काय नीचा वैऱ्यांच्या वित्तराशि पाहून
वित्त न विष्टा तुज ती आवडली स्वजनताहिताहून.
आपण राहुनि मागें रणकुंडीं होमिलीस कांता ही
आतां देहान्ताविण शासन दुसरें तुला खला नाहीं.
लागेल घोर पातक तुज विषयीं दावितां दया लेश
जो गृहभेदी पामर तो मरणाच्याच योग्य शिक्षेस.
सिंहव्याघ्रपशूंना ह्मणति महाक्रूर या जनीं सकल
परि त्यांहून भयंकर भासति जे तुजसमान पिशुन खल
तुमच्या दुष्प्रभवानें पडले किति देश आजवरि ओस
राज्यें किती बुडालीं उद्भवुनी जनपदीं असंतोष !
पडले किति संग्रामीं कारागारीं किती महामान्य
किति रक्तपात झाले होईना कल्पनाहि सामान्य !
बहुविध अनर्थ झाले अगणित होतील आणखी पुढतीं
तुजसारखे नराधम जोंवर जीवंत नांदती जगतीं !”

या ह्मणण्याची साक्ष सगळ्या जगाच्या इतिहासांत पाहिजे तितकी मिळण्या-सारखी आहे.

एकंदरींत हें काव्य फार चांगलें उतरलें आहे, आणि यास पुण्याचे विद्वत्सभेनें साह्य केलें आहे, या दोन्ही गोष्टी अत्यंत समाधानकारक आहेत. रा. जोशी हे अजून अगदीं तरूण आहेत; आणि त्यांस देवानें जी कविताशक्ति दिली आहे, तिचा असाच चांगला उपयोग करून ते अशीं आणखीं कांहीं काव्यें रचितील तर तेणेंकरून आमच्या महाराष्ट्र वाङ्मयांत चांगली भर पडून त्यांचें नांव सरस्वतिमंदिरांत चिरस्थायी होईल. देव करो आणि असें होवो !

मुंबई.
तारीख ३ सप्टेंबर १९१३

वि. कों. ओक.

# हृद्गत!

श्रीमन्मुकुंदराय, ज्ञानेश्वर-रचित पुण्यकाव्यें[1] जीं
रवि शशिपरी प्रवेशद्वारीं ज्याच्या विराजतीं आजी १

श्रीएकनाथ, मुक्तेश्वर, वामन, मयुर अन्य सत्कवि ते
ह्यांची सुपद्यपंकज-माला ज्याला अखंड भूषविते २

श्रीनामदेव, तुकया, संतशिरोमणि जनीं जयां म्हणती
फडकति जिथें तयांच्या दिव्य अभंग-ध्वजा न ज्यां गणती ३

काढिति सद्यः कविही योजुनि सद्वर्ण शब्दचित्रें तीं-
सुंदर परोपरीचीं, अनुपम शोभा सदा जया देतीं ४

ऐसें प्राकृतवाङ्मयमंदिर सजलें अनेक भूषांनीं
सद्भक्त शारदेचे त्यांत विराजति यथोचित स्थानीं ५

तेथेंच आज **पहिलें पाउल** हें भीत भीत ठेवियलें
बहु अप्रबुद्ध जरि मी देती सप्रेम हात सुज्ञ भले! ६

कवि टिळक, माधवानुज, तैसे रसिकाग्रणी भिडे, भावे[2];[3]
आभारगीत यांचें होइल थोडेंच जेवढें गावें ! ७

ज्यांकडुनि साह्यदानीं याञ्चेपूर्वीच येइ ' हो ' कानीं
उपकृति समोर आहे केली जी विबुधवर्य ओकांनीं. ८

होउनि कृपाभिलाषी या सर्वांचा सदैव परम मुदें-
श्रीशारदा-प्रसादें टाकिन पुढतीं अशीं अनेक पदें ९

'दे आयुर्बल सन्मति या शुभकार्यीं मनोव्यथा हरुनी'
प्रभु येवढेंच अंतीं कथितों तुज हृदय मोकळें करुनी ! १०

**लेखक.**

---

१ विवेकसिंधु व ज्ञानेश्वरी. २ संपादक काव्यसंग्रह. ३ संपादक महाराष्ट्रकवि.

# शब्दशूर

## आर्या.

श्रीनें सरस्वतीनें भगिनी समजून एकमेकींला
जेथें अनेक शतकें केल्या आनंददायिनी लीला १
गंगाजललहरींनीं वसुधा जेथील नित्य निष्पाप
हिमनगशिखरस्पर्शित वायू जेथें न राहुं दे ताप २
माहेर शांततेचें, ज्ञानधनाचें अमोघ भाण्डार,
जननस्थान दयेचें, धर्माचें नित्य मोकळें द्वार; ३
वर्तति अखंड जेथें शुचिता आरोग्य संपदा नीति
रविवंशभूपतींची पट्टणनगराख्य राजधानी ती. ४
वैभव थोर तियेचें अलका अमरावतीपरी साजे
भूषित करोनि गेले तेथिल सिंहासनास बहु राजे ५
त्या राजरत्नमालेमाजी शिवसिंहराज दिव्यमणी
उज्वल चरित्र त्याचें वाटे येवो अहर्निशीं श्रवणीं ६
ज्ञाता, धर्मपरायण, सत्यव्रत, सत्वशील, सुविचारी;
सुखवुनि याचकवृंदें कीर्तिसुगंधें दिशा भरवि चारी ७
प्रभुला स्मरूनि चित्तीं न विसंबे राजधर्म पळमात्र
पुण्यश्लोक महात्मा प्रातःसमयीं स्मरावया पात्र ८
दुर्लभ नृपसत्तेचा होता उपभोग घेत बहु वर्षें
परि साम्राज्यमदाचा वाराही कधिं तयास न स्पर्शे ९
समता सर्वांठायीं ठेउनि रक्षी प्रजाजनांला जो
एकुलत्या तनयाची मायहि त्या प्रेमभाजना लाजो १०
शांति प्रजाजनांची तीच असे राज्यसंपदा सत्य
हें वागवोनि चित्तीं न करी विपरीत एकही कृत्य ११

'देवा अखंड आह्मां हें निरुपम राज्यसौख्य लाभावें'
ही प्रार्थना प्रभूला करि संतत तत्प्रजा मनोभावें १२
ऐशा नृपोत्तमाचे सैनिकही राष्ट्ररक्षणीं निपुण
बलवंत या परी कीं त्यांपुढतीं ठाकती कदा रिपु न १३
बल, वीर्य, तेज, यांहीं एकाहुनि एक थोर संपन्न
जीवंत शत्रु जोंवर लागेना गोड तोंवरी अन्न १४
नृप, देश, धर्म, यांतें जर कोणी दूषवील दुष्टमतें
घ्याया प्राण तयाचा धांवति संक्षुब्ध केसरीसम ते १५
युद्धप्रसंग येतां मानिति आलें अपूर्व शुभपर्व
रिपुरक्तांत नहाया समशेरी होती नागव्या सर्व १६
परचक्र यो कसेंही पाउल मागें न केधवां घेती
जीवाकडे न बघती दृष्टि सदोदित जयाकडे देती १७
स्वजनद्रोहविषाचा गंधहि ज्यांना कदापि ठावा न
येईल कैंवि त्यांच्या राष्ट्रस्वातंत्र्यसंचिता वाण १८
जरि भिन्न भिन्न जाती स्नेह परस्पर अखंड दाखविती
जशि एक माय त्यांची गाया असमर्थ धन्यता कवि ती १९
प्रेमा भूमातेवर तितुका त्यांचा नसे जिवावरती
नांदति सानंद जसे नंदनवनिं देववृंद वावरती २०
एवंच राष्ट्रतरु हा सुफलित व्हाया अवश्य सद्गुण जे
त्यांणीं शिवसिंहाचें सेनामण्डल कसें अपूर्व सजे. २१

* * * * *

नर परम नीच ऐसा श्रेष्ठसमाजांत जन्मला एक
हंसांत काक अथवा सिंहसमूहांत जेंवि जंबूक २२
विधिनियम हा दिसे कीं कोठें परिपूर्णता नसो भुवनीं
म्हणुनीच निर्मिला हा नीरस एरंड कल्पवृक्षवनीं २३
जड, धैर्यहीन, दुर्बल, निष्फल बडबड करी दिवारजनीं
रत नित्य आत्मभजनीं भीमेश्वर हें विचित्र नाम जनीं २४

नांवासमान त्याचें रूप भयानक तसेंच वर्तनही
क्रूर स्वभाव तैसा सैतानाचाच शोभता स्नेही. २५
'मी शूर शूर' ह्मणुनी नृत्य करी नित्य कामिनीभवतीं
कृति शूरोचित लव ती स्वप्नांतहि त्यासि ठाउकी नव्हती २६
केवळ आत्मस्तुतिमय नानापरिचे प्रलाप काढून
पद मिळवि सैनिकाचें मोहावतीं नृपासि पाडून २७
रायें सैनिकवस्त्रें अर्पण केलीं तयास ज्या समयीं
वाटे वायसकंठीं सुममाला घातली सुवासमयी २८
लेशहि शिपाइगिरिचा नेणे परि काय हौशिनें नटला
अंगीं कवच, शिरावर भव्य शिरस्त्राण, आयुधें कटिला; २९
घडि घडि हात मिशांवर फिरवित चाले डुले अहंकारें
जन अज्ञ हीनबल जे भिववि तयां श्वानतुल्य भुंकारें ३०
राष्ट्राचा, स्वकुलाचा, न धरी अभिमान अन्नदात्यांचा;
स्वत्वाकडे न थोडा, ओढा स्वहिताकडे सदा त्याचा. ३१
जी कलहाची जननी दुःखखनी राक्षसीण दुःशीला
समजुनि उपास्य देवी सेवी चिरकाल त्या चहाडीला ३२
जिवलग मित्र ह्मणोनी धरिलें स्वार्थास नित्य हृदयासी
त्यास्तव किती जनांच्या माना अडकाविल्या वृथा फाशीं ३३
ऐशा बहाद्दराच्या शौर्याची काय काय सांगु तऱ्हा
कांपे भयें थरारा अंगावरि भुंकला जरी कुतरा ३४
रात्रौ निद्रित असतां जरि मूषक मंदिरांत खडबडला
कवळुनि धरी प्रियेला पर्वत जणुं त्याचिया शिरीं पडला ३५
ह्मणवी 'शूर शिपाई' येईना नीट शस्त्रही धरितां
जातां बळें लढाया पळत सुटे शत्रु गर्जना करितां ३६
बसतां अश्वावरती त्यास सुळीं चढविल्यापरी गमतें
कर कर्णांवर ठेवी करि जेव्हां समरवाद्य दुमदुम तें ३७
इतुका भ्याड तथापी भ्याडपणा व्यक्त आपुला न करी
जल्पकपणें जनांसी भासवि हा प्रबल वीर कोण तरी! ३८

अद्भुत आश्चर्यप्रद आत्मबलाच्या कथा निवेदून
टाकीयला तयानें सारा सेनासमूह वेधून ३९
गेले भाविक सैनिक त्याच्या वाचाळतेस मोहून
ह्मणती 'वीरशिरोमणि हाच खरा, श्रेष्ठ कोण याहून ४०
बहु भाग्यवंत ह्मणुनी आम्हां सहवास लाधला याचा
नरवीर हाच यासम दुसरा जगतांत नाढळायाचा' ४१
यापरि तया ठकाच्या कीर्तीचा चौघडा सदैव झडे
नृपमंत्रिमंडलाच्या श्रवणांवर तन्निनाद सहज पडे ४२
नेती आदरपूर्वक राजसभेमाजि त्या ठकालागीं
श्रेष्ठासनीं बसविती नसतां तिळमात्र पात्रता अंगीं ४३
स्थूल शरीर तयाचें अवलोकुनि 'धन्य वीर हा' म्हणती
'नरपंचानन' ऐशी पदवी करिती तया समर्पण ती ४४
बळ नसुनि मर्कटाचें 'पंचानन' नांव पावता झाला
कीं मोल कस्तुरीचें आलें वरकांतिनेंच चिखलाला ४५
व्यसनीं सज्जन पडती श्रेष्ठपदीं दुष्ट दुर्गुणी चढती
ऐसे प्रमाद नेणत राजद्वारीं कधीं कधीं घडती ! ४६

*

पदरीं अलभ्य पदवी पडतां अधिकाधिक स्वपांडित्य
प्रकट कराया लागे काढुनि तो कल्पना नव्या नित्य ४७
"युद्धें पुराणकालापासुनियां थोर थोर जीं झालीं
त्यांमाजि अग्रभागीं लढलों मी कीर्तिवंत बलशाली ४८
लढतां लढतां यापरि घालविले जन्म म्यां जरी फार
हौस न फिटे ह्मणुनि हा धारण केला फिरून अवतार" ४९
ऐशी निज जन्मकथा सांगुनि तो शब्दशूर मायावी
श्रोत्याजनांसि साऱ्या स्वचरित्राध्याय गावया लावी ५०
कर्णी कांतेच्याही आत्मस्तुतिचा असाच करि घोष
अनुभवहीन बिचारी मानितसे बहुत अंतरीं तोष ! ५१

मुक्ता नाम तियेचें सद्गुणसंपन्न सुस्वरूपा ती
जैशी मौक्तिकमाला सांपडली मर्कटाचिया हातीं ५२
अवचित सुदैवयोगें सौख्याचें लाधलें निधान करीं
जाणुनि भीम तिच्यावरि अप्रीती अल्पही कदा न करी ५३
'मी रूपहीन वायस काय सखी हंसिका सुरूप तरी
कैसा रुचेन तिजला' चिन्तन मनिं हेंच सर्वकाळ करी ५४
'प्रीती मजविषयींची राहिल तिचिया मनांत निश्चल कां'
शंका नागिणिसमही तद्धृदया मारुनी बसे विळखा ५५
होऊनि भक्त आपण दिधलें दयितेस देवतास्थान
तिज सुप्रसन्न करणें याविण हव्यास अन्य चित्ता न ५६
देउनि इच्छिल तें तें लाडकिचें कोड सर्व पूर्ण करी
क्षणभर तिलाहि वाटे युवतिजनीं मीच एक धन्य खरी. ५७

* * * * *

स्वस्तोत्रगायनाची होउनियां स्फूर्ति एकदां भीमें
कर रमणिचा धरोनी नेली अंतर्गृहामधें प्रेमें ५८
अंकीं बहु आवडिनें त्या प्रियकर कामिनीस बैसविलें
नाना विनोदवचनीं तिचिया मुखसारसा विकासविलें ५९
अभिनय परोपरीनें करुनि वदे "जिवलगे अगे परिस
केले कसे पराक्रम पूर्वीं म्यां देवदानवांपरिस ६०
अभिनव मच्छौर्यकथा गमतील वृथा तथापि मी शपथ–
घेउनियां तुज कथितों न रुचे मजला कधीं असत्यपथ" ६१
या परि आत्मस्तवनग्रंथप्रस्तावना करोनि पुढें
लावुनि कर गालाला वदला निर्लज्ज "ऐक ऐक गडे ६२
आलिंगुनि हृदयीं मी धरितों हस्तेंकरोनि तुजला ज्या
पूर्वचरित्र तयांचें काय तुला सांगुं लाडके माझ्या ६३
तोडोनि लोहबंधन एक दिनीं मुक्त होय राजकरी
शुंडा फिरवित मार्गीं धांवे भयभीत जनसमाज करी ६४

पाडीत वृक्ष, सदनें, ताडित लोकांस चालला मस्त
आकान्त थोर झाला वाटे नगरी करील उध्वस्त ६५

धांवुनि सशस्त्र आले सेनापति, सबल मल्लही जमले;
निरुपाय सर्व झाले वांचवितां प्राण आपुला दमले. ६६

कौतुक पहात होतों बैसुनि मी स्वस्थ येवढा वेळ
मजविण नुरला कोणी जो वारणवारणासि धांवेल ६७

त्या मदमत्त पशूचे तीव्र रदन भव्य देह पर्वतसा
एकाकिं आवरोनी धरिल तया अल्पशक्त मनुज कसा ? ६८

मीच म्हणुनि त्यासमयीं करिपरिहारार्थ सिद्ध झालों गे
रागें परस्परांसी झुंजत होतों चतुःप्रहर दोघे ६९

शेवटिं पुच्छ धरोनी गरगर फिरवून तो महाकाय
आदळिला भूवरती पुसतां मग तद्दशा अहा काय ! ७०

'ची ची' करीत पडला झाली शुंडा प्रचंड निर्बळ ती
दांतहि भंगुनि गेले नेत्रांतुनि अश्रु सारखे गळती ! ७१

पौरव गौरव करिती पाहुनि माझी अतर्क्य ही करणी
देवासमान पूजिति नवविकसित-कुसुममालिकाभरणीं ! ७२

प्रभु संतुष्ट जहाला परिसुनि तद्धन्यवाद गद्गदलों
सेनाधिपत्व द्याया सिद्ध जहाला परी 'नको' वदलों ७३

कृत्यें अतर्क्य ऐशीं अगणित केलीं, न दोन वा चार
सखये श्रवण करीं गे कथितों तुज आणखीहि साचार ७४

एका प्रशान्त समयीं नौकाक्रीडा करावयासाठीं
शिवसिंहप्रभुसंगें गंगेच्या प्राप्त जाहलों काठीं ७५

तें परम शुभ्र निर्मळ गंगाजल तोष मानसाला दे
नौकाधिष्ठित होउनि केला त्यांत प्रवेश आल्हादें ७६

पवनानुकूलतेनें नांव पुढें चालली महा वेगें
मानस अमुचें रमलें गमलें येथें सदा रहावें गे ७७

जैशा जलांत तैशा अस्मच्चित्तांतही उचंबळती—
लहरी आनंदाच्या, वाटे घडि निरुपमेय केवळ ती ७८

दुर्लभ सौख्य परी तें शाश्वत दों क्षणचि राहिलें कां कीं
नौकेस छिद्र पडुनी खळखळ जळ आंत येइ एकाकीं ७९

छिद्र नव्हे तें वाटे स्वर्गाचें द्वार मोकळें झालें
तेथुनि जळस्वरूपें निष्ठुर यमदूत धांवुनी आले ८०

नौकांतर्गत जळ तें आवरितां श्रमति तेधवां हात
वाटे समाधि आम्हां सत्यचि मिळणार या प्रवाहांत ८१

भरली तुडुंब तरणी आशा नुरली स्वकीय उद्धरणीं
चिंता दुर्धर पडली कैशी पायांस लागते धरणी ८२

सुटला धीर नृपाचा नाविकही जाय घाबरुनि फार
विनवुनि दोघेही मज ह्मणती दीनस्वरें 'अरे तार' ८३

पाय धरी नृप माझे वंदिति ज्यालागिं नित्य शत राजे
मम भाग्य केवढें हें प्राप्त न झालें कधींच इतरां जें ८४

रडवी रिपुस्त्रियांना जो समरीं रिपु वधोनि निजखड्गें
अत्यंत दीन होउन रडला तो मजसमोर ढळढळ गे ८५

बोले 'नको नको रे अंत बघूं अर्पितों तुला राज्य
बापा या तापांतुनि वांचिव मज्जीव एवढा आज' ८६

ऐशा करुणावचनें लागे मम हृदय पाझरायास
उठलों बहु आवेशें नृपजीवित-रक्षणा करायास ८७

ठोकून दंड वेगें गंगेमाजी प्रवेशता झालों
घेउनि शिरीं तरी ती तीरावर तीरसा त्वरें आलों ८८

भूवरि भूप उतरला तरला मच्छक्तिच्या प्रसादें तो
मान मला बहु देई भक्त प्रिय दैवता जसा देतो ८९

शिरतां नगरद्वारीं आली राणी समोर धांवोनी
सौभाग्यरक्षका मज ओंवाळी रत्नदीप लावोनी ९०

लक्ष जनांचा पालक कालकरांतोनि आणिला परत
अवमानील तयाला कोण असा गे कृतघ्न पापरत ९१

ऐशा मच्छौर्याच्या गोष्टी सखये कितीक सांगाव्या
संतत ज्या रसिकांनीं कानीं परिसून सादरें गाव्या. ९२

* * * * *

वदला परोपकारें ते पतिचे शौर्यशब्द आयकुनी
इतर स्त्री जर असती ह्मणती 'हा ईश्वरांश काय कुणी' ९३

मुक्ता मनीं समजली कीं ही पत्युक्त शूरता न खरी
परि दर्शवी न तैसें साध्वीशीलानुरूप तेंच करी ९४

शूर असो भ्याड असो जन्माचा ज्यासवें जडे संग
बोलुनि अप्रिय भाषण न करि तयाचा कधीं मनोभंग ९५

सद्गुण गुप्त रहाती अवगुण राहे न गुप्त झांकोनी
आपोआप प्रकटे वसनीं लपवोनि ठेविला वह्नि ९६

तैसाचि भीमदंभस्फोट घडे शेवटीं क्षणासरिसा
शिवसिंहराज-सदनीं काय चमत्कार जाहला परिसाः- ९७

परम भयंकर ऐसा होता तो मध्यरात्रिचा समय
साम्राज्य शांततेचें जिकडे तिकडे वनांधकारमय ९८

निर्भय अंतःकरणें निद्रा बहु नगररक्षकां लागे
तस्करजारांवांचुनि पांखरुंही एक नाढळे जागें ९९

तारापरिवारासह गेला शशि घ्यावयासि विश्रांति
कोठें मधून चमके एखादी चांदणी नभःप्रांतीं १००

भगिनी तिचीच केवळ ऐशी नृपनंदिनी मनोहर ती
निद्रित होती शयनीं प्रासादीं रत्न-मंचकावरती १०१

सौंदर्याची सीमा ती मानिति अप्सराच सर्व जन
भूषण नृपनगरीचें नवयौवनकान्तिनें सुसंपन्न १०२

मुख गौर, कृष्ण नयनें, भ्रूधनुराकार, गाल लाल तिचे
तनु सकुमार मनोहर जेंवि अनाघ्रात पुष्प मालतिचें १०३

भुज मृदु गोंडस त्यावर शिर ठेवुनि पहुडली सुनिश्चळ ती
केश विमुक्त स्कंधीं स्तनयुग्मीं रत्नमालिका रुळती १०४

झरझरित कृष्ण शालू त्यांतुनि किति रम्य गौर देह दिसे
नभिं विरल अभ्रपटलें झांकियलें पूर्णचंद्रबिंब जसें १०५

भार अलंकाराचा नव्हता देहीं तिच्या विशेष जरी
लावण्यसंपदेनें भासवि कीं हीच राजलक्ष्मि खरी १०६

संप्राप्त्यर्थ तियेच्या होउनि गेले अनेक भूप रत
धनकीर्तिवंत परि ते अनुचित समजोनि लाविले परत १०७
ऐसें अवर्णनीय श्रीमच्छिवसिंह–कन्यकारत्न
मोहित होउनि त्यास्तव मांडियला पुंडनायकें यत्न १०८
जो मूर्तिमंत राक्षस अक्ष सदा लाल मद्यपानानें
धर्माधर्म न जाणे हिंसाव्रत नित्य मांडिलें ज्यानें १०९
विक्राल, मर्कटानन, काननवासी, उदंड पुंडजनां-
मिळवुनि जेणें केली निजसैन्याची विशालशी रचना ११०
गांजुनि अनाश्रितांना ग्रामें नगरें लुबाडुनी शतशा
न तशा कधींच कोणी मेळविल्या द्रव्यराशि पर्वतशा १११
गंगोत्तर प्रदेशीं स्थापी पापिष्ठ तो स्वराज्यास
उन्मत्त दृष्टि झाली न्यायान्याय न दिसे जरा ज्यास! ११२
शिवसिंहकन्यकेच्या अभिलाषें करुनि सज्ज बहु सेना
चालून पट्टणावरि आला परि इष्टलाभ गवसेना ११३
शस्त्रें बहु बोथटलीं, हटली सेना, वरी पराभव ती
कारण अभेद्य ऐसा होता तट थोर पट्टणाभवतीं ११४
जो बहु वर्षें सोसुनि परचक्रांचे अनंत आघात
यश रक्षीत धन्याचें होता निश्चल उभाच दिनरात ११५
बहुवार वार केले परि नाहीं किमपि भंगला तट तो
शठ तो हट पुरवाया केंवि पहा अन्य रीतिनें झटतो ११६
'जो सुलभ मार्ग दाविल पट्टणनगरीं प्रवेश व्हायातें
स्थापूं मंत्रिपदीं कीं ओपूं नव लक्ष मोहरा त्यातें' ११७
ऐशी आमिषवार्ता धूर्तानें करविली प्रसिद्ध जनीं
ती पडतांच श्रवणीं उद्भवला परम लोभ भीममनीं ११८
शिवसिंहराज्यछत्राच्छादित जनवृंद शोधितां सारा
भीमचि एक निघाला स्वकरें निजमातृकंठ चिरणारा! ११९
तेणें स्वराज्यरिपुला नगराचे गुप्त मार्ग दाखिवले
नृपशासनभय नच त्या लोभपरायण नरा जरा शिवलें १२०

स्वत्वपराङ्मुखतेची चाड नसे मंदधीचिया मनिं त्या
गृहभेद–पाप करुनी लोटियलें घोर रौरवीं जनित्या ! १२१

जें परम गुह्य, ज्याचें दर्शन कवणा दुरूनही न घडे;
निजमातृभूमिकेचें हृदयस्थल करुनि दाविलें उघडें ! १२२

मग काय मात पुसतां पडलें कोलित जसें पिशाच्चकरीं
स्वर्गचि हातीं आला जाणुनियां पुंडनाथ नाच करी १२३

पुनरपि उत्सुकतेनें तेणें निज नीच यत्न सुरु केला
झाला बहु आतुर त्या हुंगाया पारिजात कलिकेला १२४

पूर्वोक्त कृष्णरात्रीं गुप्तपथें राजमंदिरीं शिरुनी
राक्षसकृति आचरुनी नेली निजचित्तमोहिनी हिरुनी १२५

होउनि पूर्णमनोरथ आनंदें चालला निजप्रांतीं
न्याय जगीं हा उलटा दुष्टा यश अयश साधुच्या माथीं १२६

कपटें जिंकियला जो लक्षबळासहि अजिंक्य राजवर
दुर्जन याच उपायें आले साधीत कार्य आजवर १२७

* * * * *

जी प्राणाहुनि होती प्रियकर सर्वां जनांस एकुलती
अवचित घालुनि घाला बाला नेती हिरोनियां खल ती १२८

हें अशुभवृत्त जेव्हां श्रवणीं संतप्ततैलतुल्य पडे
अंतःपुरस्थ युवती फोडिति गाईसमान हंबरडे १२९

पार न तद्दुःखाला भालावरि घेति हस्त हाणून
तो भव्य राजवाडा टाकिति शोकस्वरें दणाणून १३०

नेला प्राण हिराउनि भाउनि ऐसें मनांत नृपराय
क्रोधें खवळुनि गेला सर्प शिरीं टाकितां जसा पाय १३१

दुःख सुताविरहाचें होय तरी स्त्रीसमान तो न रडे
बोले "अगा प्रमत्ता पुंडा तव आज फोडितों नरडें १३२

अधमाधमा कुठें रे पळशिल देवोनियां मला जाच
कन्या–हरणें खणिली खांच तुवां साच आपणालाच १३३

तुज तुच्छ मर्कटाला कैशी पचणार सिंहदुहिता ती
आलोंच थांब दुष्टा मारुनि तुज घालितों मुखीं माती" १३४
यापरि गर्जत उठला कुटला रणदुंदुभी भयोत्कसा
होईल शीलवंता मरणप्रद मानभंग सहन कसा ! १३५
पुंडपराभवकार्या यावें धांवोनि सर्व वीरांहीं
यास्तव दूत दवडिले नगरीं फिरवित चहूंकडे द्वाही:- १३६
"ऐका ! जागृत व्हा रे ! शस्त्रकलाकुशल वीर हो शूर !
नेली चोरुनि नेली राजसुता पुंडनायकें दूर १३७
यास्तव उठा ! चला रे ! सरसावुनि शस्त्र सर्व समरास
पाडा रणभूमीवर शत्रुशिरें चिरुनि मेरुसम रास १३८
नृपबालिका नव्हे ती जणुं सद्यश-मालिकाच देशाची
रक्षुनि तिला करा रे सार्थकता आज वीरवेषाची १३९
आज्ञा अशी नृपाची जो अवमानील राष्ट्रघातकर
संतप्ततैलपात्रीं लोटुनि त्या देउं शासन प्रखर" १४०
ही राजदूतवाणी कर्णीं पडतांच वीर विख्यात
गात स्वराष्ट्रगीतें गेले धांवत रणीं असंख्यात १४१
परि तेच शब्द शरसे झोंबत बहु भीममानसीं शिरले
उरलें तेज मुखावर बल त्याचें ना कळे कुठें जिरलें १४२
घर्मजलीं तनु भिजली थिजली वाचाळताहि निःशेष
दंडासम भूवरती पडला घडला जसा महाक्लेश १४३
साश्चर्य होय भार्या चर्या पाहोनि नाथरायाची
बोले "किमर्थ सखया भ्याडाची वृत्ति ही धरायाची १४४
घाबरतो मृग रानीं शिरतां शार्दूलशब्द कानांत
त्या सारखीच तुमची होय दशा खचित आज कां नाथ ? १४५
कां कंप ये शरीरा कां वदनावरति वाहतो घर्म
परम व्याकुल झालां वीरांचा हाच काय हो धर्म १४६
महती निजशौर्याची वर्णन केली उगाच कां मग ती
मिथ्याच काय तुमचा लौकिक जो आज गाजतो जगतीं ?" १४७

यावरि काय वदे तो आणुनि लटिकाच डौल मंदेश
"कंप न गडे स्फुरण हें चढतें परिसोनि राजसंदेश १४८

कां विस्मयांत पडसी मम वदनीं आज घाम देखोनी
गे हे आनंदाश्रू, न खुळी तुजसम जगामधें कोणी" १४९

या शुष्क वाक्प्रयोगें लागे भुलवावया स्वकांतेला
परि जों क्षणहि न गेला अवघा रसभंग भीतिनें केला १५०

तिकडे राजद्वारीं द्वाही परिसोनि वीर बहु जमले
समरारंभण–सूचक भीषण घननादवाद्य दुमदुमलें १५१

घडला हृदयावरती भीमाच्या वज्रपात दुर्धर तो
बोले "हाय जिवलगे सांग करूं काय पाय तव धरितों १५२

युद्धाची न सये ही मम मरणाचीच जाहली वेळा
रणवाद्य हें कशाचें वाजत धडधड कृतान्तरथ आला १५३

सांग सखे लवलाही कांहीं सदुपाय आजि वांचाया
कासाविस बहु झाला घडिभर नच भरंवसा जिवाचा या १५४

गति चांगली दिसेना सेना मज शोधण्यासि येईल
वांचेन मात्र आतां जर धरणी स्वोदरांत घेईल" १५५

अनुभव पतिशौर्याचा आला त्या समयिं चांगला सतिला
त्याहुनि फार पुरवता हृदयावर उपजतांच लास तिला ! १५६

परि परम नम्रतेनें भार्याधर्म स्मरोनि ती वदली
"पतिराज आज इतुकी युद्धाची भीति कां तुह्मां पडली १५७

नौका घेउनि माथां नाथा तरलांत भुजवलें सहजीं
अनुचित अशा तुह्मांला रणवार्ता वाटते भयावह जी १५८

वीरें पाय न घ्यावा मागें केव्हांहि युद्धकाजातें
जावें नाचत हांसत माहेरा जेंवि कन्यका जाते १५९

अक्षयिं निजगुण गाणें समजा पुरुषार्थ यांत कांहीं न
व्हा रणसिद्ध करा पण 'नृप काजीं आजि देह वाहीन' १६०

नृप अंश ईश्वराचा सेवावें त्याजला मनोभावें
त्या सुखवाया काया कष्टवुनी सुप्रजेंत शोभावें १६१

अथवा नृपाल म्हणजे समजा आत्माच देश हा देह
इंद्रियगणसम आपण आहों सर्व प्रजा न संदेह ॥ १६२
आत्मा दुःखित होतां तळमळ करितात इंद्रियें दाही
तैसा नृपदुःखाचा लागावा वेध आपणालाही १६३
स्वापत्यभावनेनें जो नेहमिं कष्टतो प्रजेकरितां
स्मरल्याविण त्या प्रभुला दवडुं नये दिन कधींहि एक रिता १६४
जो राजनिष्ट भावें ठेविल नृपतीस नित्य संतोषी
अनुकूल सर्व त्याला हें सांगाया नको कुणी जोशी १६५
कोट्यवधीजनसेवन-पुण्य असे एक राजसेवेंत
इच्छिति भले प्रजाजन वरिवरि ऐसे प्रसंग यावेत १६६
तो पुण्ययोग साधा घ्या धांव रणांगणाकडे त्वरित
होउनि हताश बसलां प्राणाची कां विवंचना करित १६७
जागा जा गांठा ती रागानें वीर ज्या स्थळीं लढती
समशेर शीघ्र उपसा आहे करिहून काय हो जड ती १६८
येतां समरक्षेत्रीं श्रेयस्कर मरण मानिती शूर
आपण 'नरपंचानन'कां पळतां मृत्युच्या भयें दूर" १६९
तैं परम खिन्न वदनें भीम वदे "गे नको नको बोलूं
या मर्मोक्तिशरानें मम काळिज लाडके नको सोलूं १७०
तुकती तुला निवेदन केली निजशूरता अलौकिक मीं
नाहीं अजून झाला तव संशय काय गे तथापि कमी १७१
वाटे मज मरणाचें भय ह्मणुनी प्रार्थितों तुझे पाय
ऐशी शंकाहि मनीं आणुं नको लाडके तिळप्राय १७२
मज ठाउकें असे कीं चुकवुनि मरण न टळे कदाकाळीं
पर्वत–शिखराहूनहि टाकिन निर्भयपणें उडी खालीं १७३
आयाळ धरुनि हातीं देइन सिंहाचिया मुखीं मान
काय कथा मरणाची मम धैर्याला जगांत सीमा न १७४
शिर घेउनि तळहातीं गाजविली कीर्ति आजवर ज्यां जी
केवळ मरण–भयानें घेइन मळवून काय ती आजी १७५

इतुका पराक्रमी मी कां या समयींच जाहलों मूढ
तव अल्प बुद्धिला हें सहजचि वाटेल लाडके गूढ १७६

दारुण रण मज वाटे कां तें तुज ऐक सांगतों कांते
पथ गुप्त वित्तलोभें दाखविले म्यांच शत्रुलोकांतें १७७

पडला निजप्रभूवर कन्याहरणप्रसंग घोरतर
कारण असें तयाला मीच अधम दुष्ट घातकी प्रखर ! १७८

ठेवियलें तुजपासुनि चोरुनि हें कर्म आजपर्यंत
न धरीं मनिं तद्दोषा योषा तूं बहुगुणी क्षमावंत १७९

राजद्रोह दुरित हें पदरीं बांधोनि घेतलें आज
सत्वस्थ साभिमानी बंधुजनां पूर्ण आणिली लाज ! १८०

आतां रणांत जातां येइल तें घोर कर्म बाहेर
लत्ता नितंबभागीं मारुनि जो तो करील आहेर १८१

संतप्त तैलपात्रीं देतिल मम भव्य देह लोटून
रक्षा क्षणांत होइल, हाय ! जहाली कुबुद्धि कोठून ! १८२

मरण न टळे कदापी परि ऐशा अपयशामधें मरणें
याचेंच दुःख वाटे फाटे काळिज अहा कसें करणें १८३

ऊठ सुशीले माझ्या लज्जा ठेवुनि समस्त एकिकडे
युद्धप्रसंग जेथें जाउनि चुकवेल ने त्वरें तिकडे १८४

मत्प्राणपंकजाची तूं अससी मूर्त चारु चंद्रकला
व्यर्थ न अधिक श्रम दे प्रमदे अत्यंत जीव हा थकला १८५

तूं पतिहिततत्परशी करशील पळांत दुःखमुक्त मशीं
यास्तव मीच निवेदन करितों तुज युक्ति एक उत्तमशी १८६

युद्धास्तव मजसाठीं जा नृपसैन्यांत, घे पुरुषवेष;
कपटस्फोट न व्हावा यास्तव लढ दावुनी रणत्वेष. १८७

माझी शस्त्रकुशलता, युद्धनिपुणता, अपूर्व बल माझें
साजेल यांजला जें वर्तन कर गे न अल्पही लाजें १८८

नाहींच तोड दुसरी जोड मला आज येवढी दे गे
काढोनि कंकणें हीं खड्ग करीं सुंदरी धरीं वेगें १८९

सौभाग्यहार तुझिया कंठींचा पाहतो तुटायाला
एकचि मला दिसे हा संरक्षण–मार्ग चोखटा याला १९०
जरि निंद्य आचरण हें या समयीं जाण पुण्यदायकसें
पतिदेव तोषवाया घडतां कांहीं अधर्म दोष नसे
पाहूं कशी मला तूं अर्धांगी आज साजतेस गडे
जा जा स्मरणहि माझें कोणा होऊं न दे अशी झगडे १९२
या युक्तिनें जिवलगे व्यसनार्णवपार पोंचवी मजसी
मग सुखविलास भोगूं इंद्राणी इंद्र नंदनांत जशीं" १९३
या विविध शब्दजालीं गुंतवि भार्येस तो विगतलज्ज
खल धर्मनीतिभुवना लावाया आग जाहला सज्ज १९४
पतिधर्मपालनाची काय विवाहांत वाहिली आण
पडली विस्मृति सारी तीहुनि संरक्ष्य वाटला प्राण १९५
भ्याला न तो दुरात्मा कालमुखीं कामिनीस ढकलाया
दैत्य पिशाचाविरहित उपमा दुसरी जगांत न खला या ! १९६

* * * * *

परिसोनि नाथवचनें मुक्तेच्या मृदुल हृत्पटावरती
बहुविध तरंग उठुनी राहे मृगलोचना उभी स्थिर ती १९७
आधींच गौर कान्ती होती वस्त्रहि सुशुभ्रसें ल्याली
तेणें नूतन घटित स्फटिकाची मूर्ति भासती झाली १९८
गळली गहन विचारीं हालेना शब्द एक बोलेना
कंठांतिल हाराचीं रत्नें जणुं मोजिते अधोवदना १९९
कांहीं क्षणें तिचा हा सारा संमोह होउनी नष्ट
तेज रणोत्साहाचें झळके तिचिया मुखावरी स्पष्ट २००
स्वमनिं ह्मणे "मी असतां क्षत्रियबाला रणासि कां भ्यावें
घ्यावें खड्ग करीं मग मारुनि किंवा मरून शोभावें २०१
वाटे परम प्राणप्रिय आह्मां पौरवांगनांना जी
शिवसिंहप्रभुतनया पडली दुःसह्य संकटामाजी २०२

तिचिया विमुक्ततेस्तव गळले मद्रक्तबिंदु संग्रामीं
कीं देहपात झाला तरि मानिन फार धन्यतेला मी २०३

आतां नरवेषानें फसवावें नृपतिला न हें उचित
परि यांत पाप जितुकें पुण्य असे अधिक त्याहुनी खचित २०४

मुक्ति प्रभुकन्येची, आज्ञा पतिची, सुकीर्ति पितरांची;
या तीन पुण्यकार्जी प्राण त्याजीन आपुले पांची. २०५

करितां असा सुनिश्चय बाहुद्वय पावुं लागलें स्फुरण
ती क्षात्रवंशजाता आतुर झाली करावयास रण २०६

वंदुनि पाय पतीचे बोले सद्गदित होउनी 'माथा
जातें युद्धास्तव मी चिंता सोडा सुखें रहा आतां' २०७

गांठाया रणदेशा वेषांतर करुनि चालली मग ती
पाळाया पतिवचना साध्वी न कधीं जिवाकडे बघती २०८

कुसुमापरि मृदु कर ते खड्ग अति प्रखर जाहले धरते
परतेना पद एकहि रणभूमिकडेच जाय झरझर तें २०९

खचित अशा अबलेच्या धैर्याची महति काय बोलावी
गृहलक्ष्मीच गृहांतुनि हांकुनि हतभाग्य भीम तो लावी! २१०

मार्गीं जातां जातां देवालय एक भव्य देखून
झाली बहु हर्षवती, भावि यशाचीच ती गमे खूण २११

जाउनि आंत सुचरिता करि तारण व्हावयास्तव स्तवन
"हे प्रभुराया धर या निष्ठुरता दीन दासिवर लव न २१२

पतिरक्षणार्थ जातें नरवेषें समर मी करायासी
कवणा कळों न दे हें कुशलस्थित ठेव नाथरायासी २१३

लोभें मंत्रिपदाच्या नीचातें वर्म दाविता झाला
दुष्कर्म घोर जरि तें दीनदयाळा करीं क्षमा त्याला २१४

जरि येवढें न घडलें पडलें दुर्दैव आमुचें आड
तर या अभागिनीची रणकुंडाग्नींत आहुती पाड" २१५

या परि मागुनियां वर सत्वर समरार्थ चालती झाली
शिवसिंहराजयाच्या विस्तृत सैन्यार्णवीं उडी घाली २१६

* * * * *

आज्ञा मान्य करोनी गेली युद्धार्थ आपुली रमणी
हें अवलोकुनि झाला आनंदित भीम फार फार मनीं २१७
केला भला पराक्रम गाजविली शक्ति, शौर्य, चतुराई,
ऐसें समजुनि चित्तीं नाचत अंतःपुरामधें जाई. २१८
द्वारें लावुनि सारीं अंधारामाजि चोरसा लपला
गतभर्तृका स्वगर्भा तैसें निजकपट झांकण्या जपला २१९
पाहे गवाक्षमार्गें केव्हां केव्हां हळूच बाहेर
कीं येताहे कोणी काय मला धरुनि न्यावया हेर २२०
आला हेर तथापी तन्नयनीं धूळ टाकण्याकरितां
त्या कपटनाटक्यानें दाखविली आणखीहि तत्परता २२१
स्त्रीनें सोडियलीं तीं वस्त्रें वेढोनि वेष पालटिला
करिं कंकणें भरोनी लावियला भालदेशिं लाल टिळा २२२
दुसरेंहि इष्ट तें तें स्वीकारुनि कुलवधूपरी नटला
विटला पुरुषत्वाला स्त्रीभावचि मंदबुद्धिला पटला २२३
शृंगार सर्व करुनी आदर्शीं स्वस्वरूप पाहून
डोलावयास लागे 'तुच्छ' ह्मणे स्वर्गसौख्य याहून २२४
बालिश लीला ऐशा एकांतीं करित बैसला मंद
विक्राळ काळ सन्निध आला त्याचा तया नसे गंध. २२५

* * * * *

तिकडे रणभूमीवर हातीं घेवोनि तीक्ष्ण तरवार
मुक्ता उडवित होती शत्रुशिरें करुनियां प्रखर वार २२६
सकुमार मारवल्ली जरि नव्हती संगरीं कधीं आली
शौर्य अलौकिक दावी समरज्ञहि पाहुं लागले खालीं २२७
रिपुशस्त्र जागजागीं लागुनि रक्तांत नाहला काय
तो समरदेवतेला सिंदूरें लेप जाहला काय ! २२८
संग्राम चार घटिका दोन्हि दळें मांडिती अविश्रांत
सौदामिनिसम मुक्ता चमकत होती पदोपदीं त्यांत २२९

झालें उदित तियेच्या अंगींचें जन्मसिद्ध शूरपण
येता प्रसंग न तरी जातें तिजसह लयास तेंहि पण २३०
येतें गुणप्रकाशन केवळ कालाचिया कृपें घडुनी
अनुकूल तो नसे तर रत्नें मातींत राहती पडुनी २३१
झाला बलप्रदाता मुक्तेला तोच शत्रुसंहरणीं
अबला तथापि होती बलवंतालाहि लाजवीत रणीं २३२
शेवटिं तिच्याच वारें रिपुसेनानाथ पावला पतन
इतरां पलायनाविण त्या समयीं राहिली दुजी गत न २३३
होतां पुरा पराजय पावुनियां पुंडपालक क्लेश
सोडुनि राज-सुतेला गेला गांठीत आपुला देश २३४
संगें विजयश्रीला घेउनि ती बंधमुक्त नृपबाळी
आली धांवत हर्षें निज जनकाच्या गळीं मिठी घाली २३५
खळ खळ आनंदाचे अश्रु तदा ढाळिती पितापुत्री
प्रेमा पाझर फुटती उठती रोमांच त्यांचिया गात्रीं ! २३६
वात्सल्यें कुरवाळुनि चुंबुनि रायें स्वकन्यकावदना
मणिमय रथांत घालुनि हर्षें मिरवीत आणिली सदना २३७
मागुनि सेना सारी सोडुनियां विजयदत्त संगर तें
आनंदवाद्यघोषें नाचत पट्टणपुराकडे परते २३८
नयनीं नृपस्त्रियांच्या जेव्हां ती दयित बालिका पडली
क्षुधिता सुधा मिळे कीं वाटे कृपणास ठेव सांपडली ! २३९
काढुनि दृष्टि प्रेमें ह्मणती 'ये भेट राजसे बाई'
स्कंधीं उचलुनि घेती नेती अंतःपुरांत लवलाही २४०
झाली नगरस्थांची राजद्वारासमोर बहु दाटी
बैसुनियां गजपृष्ठीं सचिव समस्तांस शर्करा वाटी २४१
शृंगारिलें नगर तें चित्रविचित्र ध्वजापताकांनीं
जयघोषाविण दुसरा ध्वनि येईनाच कोणता कानीं २४२
केला जयप्रदर्शक दीपोत्सव केवढा निशाकालीं !
दीप न, गमती आल्या गगनींच्या तारका जशा खालीं. २४३

जनपद रमले सारे ऐशा अभिनव जयोत्सवामाजी
परि त्यांत भीमकान्ता न दिसे बहु कारणी जयाला जी २४४

रिपुसैन्य घाबरोनी दाहि दिशा पळत जेधवां जाय
तेव्हां अवचित कोणी हाणी खल खड्ग तीजवर हाय ! २४५

शिव ! शिव ! त्या पाप्याचा पडला नाहीं गळून हात कसा
न कळत अबलेवरती मागुनी जो शस्त्र चालवी ठकसा ! २४६

व्याकुल होउनि पडली धरणीवर हातपाय झाडीत
जी कांहीं क्षण पूर्वीं होती रिपुमर्कटासि ताडीत २४७

जी रंगवीत होती धरणीतल शत्रुरक्तबिंदूंनीं
निज रक्तेंच पहा ती भिजली शीर्षप्रदेश विंधूनी २४८

पुष्पोपम बहु कोमल देह तिचा होय छिन्नविच्छिन्न
पडली रणीं मृतांच्या राशीमाजी करोनि मुख खिन्न २४९

* * * * *

भीषण ती रणभूमी घडला नुकताच घोर संग्राम
नाम न निर्मलतेचें अमंगलाचेंच केवल ग्राम २५०

नरमांसशोणिताचें प्रोक्षण जैसें तया स्थलीं केलें
त्यांतचि जागोजागीं आढळती प्रेतपुंज पडलेले २५१

पद एकचि कोणाचें कोणाचे हस्त दोनही तुटले
अरिकृत शस्त्राघातें कितिकांचे शिरकमण्डलू फुटले २५२

आसन्नमरण कोणी तळमळती पडुनि त्याच ठायासी
आठवती गृह कान्ता परि नाहीं बल तयां उठायासी ! २५३

आले क्रूर पशू खग धांवुनि भक्षावया शवां नीच
दिधली समानशीलां कालानें थोर मेजवानीच ! २५४

कोणाच्या शिरिं बैसुनि फोडिति खल काक चंचुनें डोळे
फाडिति हृदय कुणाचें मांसाशनलुब्ध लांडगे कोल्हे २५५

आरक्त आंतड्यांच्या माळा ज्यांच्या गळीं अशीं श्वानें
भांडत नाचत सुटतीं, याचक देखुनि जशीं महादानें. २५६

वनांत जेविं शुष्क काष्ठें तसा अस्थिप्रसार सर्वत्र
पद एकहि ठेवाया स्थल निर्मल आढळेचिना तत्र २५७
झाले रुधिरतुषारें सारे पाषाण आणि तरु लाल
त्यायोगें बहु भासे समरक्षेत्रस्वरूप विक्राल २५८
यापरि कालक्रीडा-भुवनोपम संगरप्रदेशांत
होती पडून मुक्ता देह जिचा क्लांत मानस भ्रांत २५९
किंचित चलन कराया गात्रीं बल राहिलें न तिळमात्र
खिळली जणुं धात्रीला कंठि अशा दुःस्थितीमधें रात्र २६०
झुळझुळ वाहूं लागे बहु शीतलसा प्रभातचा वारा
किरणें बालरवीच्या उज्वल भूभाग जाहला सारा २६१
तेव्हां बहु कष्टानें उघडुनि लोचन बघे सभोंतालीं
वाली तिला न कोणी आढळला मृत्युवीण त्या कालीं २६२
किरण प्राणाशेचे हृदयांतुनि पार नाहिंसे होती
निजचारित्र्यचमत्कृति लागे एकेक आठवाया ती:- २६३
"पतिशब्द मान्य करुनी नृपकन्यामोचनाचिया कामीं
हा पुरुषवेष घेउनि आलें युद्धांगणीं लढाया मी २६४
भो चित्रगुप्त लिहिलें पातक कीं पुण्य माझिया नांवें
सांगा सांगा तुमचें लेखनचातुर्य काय वानावें ! २६५
म्हणतां 'पुण्यचि लिहिलें' परि ये संशय मदीय बुद्धिस तो
कारण हा दुःखाचा डोंगर मजपुढतिं केवढा दिसतो ! २६६
जर हें प्रकट जहालें मद्वेषांतर-रहस्य लोकांत
नियमापरी नृपाच्या होइल शिक्षेस पात्र तो कांत २६७
न्यायें जो अपराधी ठरला त्यावर दया न या राज्यीं
सरणार साच सारी शीतल सौभाग्यसाउली माझी २६८
तो दुष्प्रसंग देवा ! देवा ! दृष्टिस पडो कदाही न
त्या हीन जीविताहुन आनंदें मरणदुःख साहीन ! २६९
वेंचियलें नृपकार्यीं होतें सामर्थ्य जें स्वदेहांत
पुढचें सौख्य नको तें आतां येथून जोडितें हात ! २७०

१८०६

या रणरंगीं पडले धन्य खरे तरुणवीर हे [illegible]
त्यांचा सुकीर्तिपरिमल भरला भुवनीं यशःकुसुम[illegible] २७१
धारातीर्थपुनीतां या पतितां मम असो नमस्कार
स्वर्गद्वारीं यांचा सुरजन करितिल अपूर्व सत्कार २७२
स्वर्गद्रुमसुममाला तत्कंठीं घालितील सुरकन्या
बहु धन्य भाग्य त्यांचें तेंवि तयां प्रसवती सती धन्या २७३
मजला अभागिनीला प्राप्त न होई तशी अजून गती
आश्चर्य कीं असति जे मरणोत्सुक तेच फार दिन जगती ! २७४
न कळे मजवरि इतुका तो जगदीश्वर किमर्थ कोपावा
वाटे बळेंच आतां प्राण कृतान्तांजलींत ओपावा २७५
व्याकुल होउनि पडलें तरि आहे शक्ति माझिया हातीं
या घोर यातनांतुनि जीवाची मुक्तता कराया ती २७६
ये बा ये यमराया घे पदरीं दीन दासिला आतां"
करुणोद्गार असे बहु काढुनियां सिद्ध होय निज घाता २७७
केला अनन्यभावें देवा पितरां प्रणाम शेवटिचा
चरण स्मरोनि पतिचे उपसुनि खंजीर काढिला कटिचा २७८
अनुलक्षून तयाला बोले "हो परम तीक्ष्ण बा खड्गा
दुःसह दुःखांतुनि या मुक्तेची त्वरित मुक्तता कर गा २७९
रे तूंच देव माझा भर्ताही तूंच तूं पिता माता
हो साह्य या प्रसंगीं येउं नको मागुतीं उरीं जातां" २८०
यापरि मतिभ्रमानें बडबडतां फार पावली श्रम ती
अंतिम आयुष्यक्षण केवळ तिजला युगापरी गमती २८१
शेवटिं कठोर चित्तें खोंचुनि तें खड्ग घेतलें पोटीं
'हा नाथ ! नाथ !' ऐशी भीतिप्रद हांक मारिली मोठी २८२
सोडून देहममता शस्त्रें जरि उदर आपुलें कापी
हट्टी प्राण तियेचा नाहीं गेला निघून अद्यापी २८३
शोकें मारियली ती हांक तिची जाय दूर ऐकाया
आले अवलोकाया सैनिक मार्गस्थ दोन त्या ठायां २८४

वीर दिसे परि बोले अबलेसम ‘नाथ नाथ’ हे शब्द
होउनि विस्मित दोघे अवलोकित राहिले उभे स्तब्ध २८५
तो वर्ण केतकीचा, म्लान परी वदन वर्तुलाकार;
वक्षःप्रान्तीं लोळे होउनियां मुक्त कृष्ण कचभार. २८६
वस्त्रें झांकियलें उर तरि तत्परिपुष्टता न झांके ती
स्त्रीदेहलक्षणें या शंका बहु सैनिकांतरीं येती २८७
करिती पुन्हःपुन्हां ते अवलोकन परमदक्ष नृपभृत्य
संदेह सर्व सरला आलें समजोनि शेवटीं सत्य २८८
ही पुरुषवेषधारी नारी ऐसेंच जाणुनी ठाम
प्रश्न तिला बहु केले ‘गे तूं स्त्री कोण’ ‘काय पतिनाम’ २८९
समजोनि वर्म सारें प्रश्न असे जेधवां विचारीती
होती व्याकुल त्यांतचि पावे अधिक व्यथा बिचारी ती २९०
शोकक्षोभें खळखळ नेत्रांतुनि विमल आसवें गाळी
जणुं शुभ्रपुष्पमाला अंतीं भूदेविच्या गळीं घाली ! २९१
नाम न सांगे पतिचें सैनिक जरि दापिती किती रागें
चित्तीं पतिव्रतेच्या पतिरक्षणहेतु नेहमीं जागे ! २९२
दुःखाश्रुपूर्णनयना लावुनि कर तेधवां कपाळास
‘झणिं मरण दे’ ह्मणोनी विनवूं लागे त्रिलोकपाळास २९३
कष्टें लोचन उघडुनि पाहे आहेत कालदूत कुठें
श्रम जाहला अनावर सर्वांगालागिं थोर कंप सुटे २९४
असमर्थ पूर्ण झाली बाह्यांतर वेदना सहायास
स्वर्गीं शेवटिं गेली अक्षयसुखमंदिरीं रहायास ! २९५

* * * * *

वार्ता ही श्रुत होतां केलें बहु नवल नागरीकांहीं
धांवत येति पहाया होते बहुत श्रमी जरी कांहीं २९६
मंत्रिजनांसह आला शिवसिंहहि ऐकतांच अभिनव तें
आश्चर्यें अवलोकित सर्व उभे राहिले शवाभवते २९७

तर्क न चाले कांहीं न कळे ही कोण कोठली तरुणी
संग्रामास्तव आली कां ऐसा पुरुषवेष पांघरुनी २९८

होतां कुंठित सारे वृद्ध कुणी हळुहळू पुढें सरला
बोले "जाणतसें मी या दुष्कर्मासि कोण अनुसरला २९९

वेषांतर करवोनी युद्धाला पाठवी स्वललना ही
ऐसा आत्मपरायण भीमावांचून अन्य खल नाहीं ३००

त्याणेंच गुप्तमार्गें आणियले पुंड आपुल्या नगरीं
कारण रणप्रसंगा तोच दुरात्मा बसे लपून घरीं ३०१

वृत्तांत हा समजला मजला या तरुणिच्याच तोंडून
देवालयीं तदा मी होतों ध्यानस्थ हस्त जोडून" ३०२

जन भीमनाम कर्णीं पडतां आश्चर्य मानिती मोठें
ह्मणती खरेंच नाहीं दिसलें तें रव संगरीं कोठें ३०३

'आणा धरून आणा त्या नीचा' गर्जती असे अवघे
नृपदूत शस्त्रधारी नगरीं तत्काल धाडिले चवघे ३०४

तो भीम भीमकर्मा हांसत होता स्वमंदिरामाजी
समजोनि मानसीं कीं निश्चिंत प्राण जाहला आजी ३०५

"विजयश्री निःसंशय शिवसिंहप्रभुकरींच येईल
त्या उत्सवरंगीं मग लक्ष कुणी मजकडे न देईल ३०६

मद्दर्शनार्थ कांता आतां झाली असेल आतुर ती
बहुधा येइल सत्वर कारण मम भुज पदोपदीं स्फुरती ३०७

त्या प्रियकरिणीवांचुनि मन्मन हें किमपि शांति पावे न
वेशीमधेंच तिजला पाहुनि आलिंगनार्थ धांवेन ३०८

रक्तांत रंगलेलीं वस्त्रें शस्त्रें तिचीं जयप्रद तीं
लेवोनियां निजांगीं मिरवत जाईन भूपतीपुढतीं ३०९

तो बहु गुणज्ञ मजला सन्निध बसविल धरोनियां पाणी
कालेंकरून होइन मी राजा मत्प्रियोत्तमा राणी" ३१०

रममाण पूर्ण झाला ऐसा नाना मनोरथांमाजी
उघडून दार बोले 'आली हो लाडकी पहा माझी' ३११

दिसली न लाडकी परि धडकी हृदयीं भयें भरे भारी
नृपदूत पाशधारी दिसले द्वारापुढें उभे चारी ३१२
सरला सत्वर मागें पदरानें वदन आपुलें झांकी
हेतू मनांत हा कीं वाटो दूतांस ही कुणी काकी ३१३
द्वाराआड लपोनी सांगे काढून बायकी सूर
'नाहीं घरांत कोणी जाणं झालें लढाइला दूर' ३१४
या कपटनाटकानें ते चवघे चतुर चार ना वळले
खल भीम हाच ऐसें जाणुनि तत्काल हस्त आवळले ३१५
बांधुनि वन्यपशूसम नेतां मार्गीं पडे, रडे, लोळे.
दीन स्वरें 'अरे रे टाकूंद्या वेप हा तरी' बोले ३१६
ओढित तसाच नेला झाला जरि नष्टचेष्ट घाबरुनी
अवलोकितांच सारे ह्मणती 'ही कोण आणिली धरुनी' ३१७
हा कपटवेषधारी भीम असें जेधवां कळों आलें
धिक् धिक् नीचा ह्मणुनी परम तिरस्कार दाविते झाले ३१८
शिवसिंहप्रभु रागें लागे आरक्तनेत्र लक्षाया
आज्ञा करी स्वदूतां द्या रे नियमानुसार शिक्षा या ३१९
"भुललास काय नीचा वैऱ्यांच्या वित्तराशि पाहून
वित्त न विष्टा तुज ती आवडली स्वजनता-हिताहून ३२०
आपण राहुनि मागें रणकुंडीं होमिलीस कांता ही
आतां देहान्ताविण शासन दुसरें तुला खला नाहीं ३२१
लागेल घोर पातक तुजविषयीं दावितां दया लेश
जो गृहभेदी पामर तो मरणाच्याच योग्य शिक्षेस ३२२
सिंहव्याघ्रपशूंना ह्मणति महाक्रूर या जनीं सकल
परि त्याहून भयंकर भासति जे तुजसमान पिशुन खल ३२३
तुमच्या दुष्प्रभवानें पडले किति देश आजवरि ओस
राज्यें किती बुडालीं उद्भवुनी जनपदीं असंतोष ! ३२४
पडले किति संग्रामीं कारागारीं किती महामान्य
किति रक्तपात झाले होईना कल्पनाहि सामान्य ! ३२५

बहुविध अनर्थ झाले अगणित होतील आणखी पुढतीं
तुजसारखे नराधम जोंवर जीवंत नांदती जगतीं ! ३२६
भरिलींस कंकणें हीं केलें विधिनें अशा तुला नर कां !
अस्मद्राष्ट्रकलंका मूर्खा हो सिद्ध जावया नरका.'' ३२७
हे शब्दसर्प दुर्धर डसले त्या भीममानसा चार
पाशीं मृग गुंतावा तैसा अति दीन होय साचार ३२८
मरणार दों क्षणांनीं सोडीना तरिहि आपुले गुण तो
निजपाप लोपवाया काय पहा शठशिरोमणी ह्मणतोः– ३२९
"राजाधिराज घ्या हो परिसुनि वृत्तांत सर्व मम आधीं
भूमिभुजंगन्यायें ह्मणतां मज कां उगाच अपराधी ३३०
युद्धार्थ सिद्ध झालों द्वाही पडतांच माझिया कर्णीं
चढलें स्फुरण शरीरीं पाजळिलें शस्त्र शत्रुसंहरणीं ३३१
उड्डान फार वेगें करुनि निघालों रणांगणीं जाया
आली आड परी ही मम दुर्दैवानुसारिणी जाया ३३२
जातें मी नरवेषें युद्धास्तव संगरांगणामाजी
अनिवार हट्ट ऐसा घेउनि बसली प्रियांगना माझी ३३३
प्राचीन ऐतिहासिक अबलांचीं सांगुनी उदाहरणें
मन्मति कुंठित केली झाला निरुपाय काय त्यां करणें ! ३३४
बांधुनि शिरीं दुपेटा पायजमा चढविला तिनें पायीं
किति विनविलें तथापी ऐकेना ती दुराग्रही कांहीं ३३५
अनुमोदन बहु कष्टें देउनि तिजला रणांत पाठवली
न कळे मला कशी ती आत्मविघातक कुबुद्धि आठवली ३३६
गेली परमोत्साहें रणनवरी नाचवीत तरवार
प्रतिपाउलास तिचिया ममहृदयावर बसे प्रखर वार ! ३३७
सदन श्मशान गमलें निद्राही मज न ये तया रात्रीं
तळमळ उडे जिवाची स्त्रीविरहज्वर भरोनियां गात्रीं ३३८
दुःखानें स्मृति नुरली वस्त्र तिचें वेढिलें अजाणपणें
जलविरहित मीनासम झालें दुःसाध्य जीविता जपणें ३३९

क्षोणीतलीं न कोणी मजसम हतभाग्य जीवकोटींत
भेटीस्तव प्रियेच्या बसलों दिन एक एक लोटीत ३४०
भेट न तिची परी या दूतांची मात्र तेधवां घडली
याचित घनांबु असतां चातकवदनांत मृत्तिका पडली ३४१
अपराध यांत माझा काय? असे तरि करा क्षमा राया;
दूतांसि आवरा या जे असती मजसि दक्ष माराया. ३४२
झालों शत्रुजनां वश दोष मला हाहि लाविला खोटा
साह्य करीस करिल कां जो आला सिंहिणीचिया पोटा?" ३४३
या भीमभाषणानें शमला भूपालकोप तिळभर न
कैचें जीवित-रक्षण दों क्षण आधींच पावला मरण. ३४४
वंचकपणा प्रकटला झटला जरि साधुशील दावाया
दुष्कृति झांकायाचे यत्न जनीं जाति सर्वदा वाया. ३४५

* * * * *

भीमनृपोक्तिस्नेहें लोकक्रोधाग्नि तेधवां चेते
नृपतीसह सकलांच्या येती संतापशब्द वाचेतें ३४६
परम प्रेमळ भावें जो जड पाषाण पूजिला मागें
त्याचें चूर्ण कराया उत्सुकले सानथोर जन रागें ३४७
ह्मणती "अहो प्रभूजी व्यर्थ महत्पद दिलें पहा याला
परि एक क्षण आतां योग्य न जीवंत हा रहायला ३४८
गुण ह्मणुनि दुर्गुणांचा केला गौरव उगाच आजवरी
पृथ्वीं वाहुनि याचें ओझें ही भूमिमाय लाज वरी ३४९
चढवा सुळावरी कीं बांधुनि कर पद करा कडेलोट
अथवा अन्य उपायें झणिं विझवा भीमजीवितज्योत" ३५०
कोणी विचित्र ह्मणती 'ठेवा याला अशाच वेषांत
फिरवा दारोदारीं करवा उपहास सर्व देशांत' ३५१
यापरि सांगति सारे पूर्वींचा प्रेमभाव टाकोनी
आश्चर्य कीं दयेचें नांवहि काढी न तेधवां कोणी ३५२
'या नीचानें स्त्रीसहगमन करावें' असेंच परिणामीं
ठरलें सर्वमतानें, शिक्षेची रीति योजिली नामी. ३५३

जावें सती पतीनें पत्नीमरणीं अशी विचित्र परी
कोणीं न पाहिली वा श्रवणहि केली नसेल आजवरी. ३५४
'पडणार दृष्टिला तो आज अपूर्व प्रसंग' वार्ता ही
कळतां नागरिकांची भरली यात्राच थोर त्या ठायीं ३५५
रचिली चिता भयंकर काष्ठें आणोनियां समस्तांनीं
निर्जीव सजीव असे जाळाया दोन देह त्या स्थानीं ३५६
प्रेता सुवासिनीच्या विधियुक्त प्रथम लाविला दहन
ज्वाला धडधड उठुनी धूम्राचा लोट लोटला गहन ३५७
"या प्रलयवन्हिमाजी माझी होणार आहुती आहे"
येतां भीममनीं हें दाहे तो स्पर्शली न जरि आहे ३५८
तदुःखास न सीमा घे मारुनि मस्तकावरी हात
गडबड भूवरि लोळे केला रडरडुनि थोर आकान्त ३५९
मुद्रा केविलवाणी करुनि पुन्हां नृपमुखाकडे पाहे
विनवी "प्रभो पुरे ही निष्ठुरता तारिं तारिं लवलाहे ३६०
'आ' करुनि पाहते ही घोर चिताराक्षसी मला खाया
जीवित अमोल माझें राया हो त्वरित सिद्ध राखाया ३६१
विद्वान मंत्रिजन हो मत्प्राणावरति सर्व कां उठलां
देहान्तशासनोचित केला अपराध म्यां असा कुठला ? ३६२
शांत क्षणभर व्हा हो राहो हृदयीं विवेकिता कांहीं
मज निरपराधियाला मारुनि अपकीर्ति जोडितां कां ही ! ३६३
दवडूं नका अकारण मजऐसा मोहरा करा जतन
योजियली बहु दारुण शिक्षा ही न्यायशास्त्रसंमत न ३६४
निर्दोष मी तथापी दोषी दिसलों जरी तुह्मां लोकां
कोंडा कारागारीं, हातीं जड लोहश्रृंखला ठोका. ३६५
टाकूं नका परंतू जंतूसम अग्निमाजि बावांनों
द्या प्राणदान दीना तुमचें यश जगत सर्वदा वानो" ३६६
ऐशीं विलापवचनें वदला, घडला बहु श्रमी शोकें
ऐकेना परि कोणी उलटा उपहास मांडिला लोकें. ३६७

१०६८

अति होय दीनवाणा प्राणदशा अल्प मानसीं नुरली
धरली भूमि तयानें पापांची घटपरंपरा भरली. ३६८
नृपदूत शासनास्तव ओढित नेती तया चितेजवळी
दर्शक अमंगलाचीं कर्कश वाद्यें अनंत वाजवलीं ३६९
'बळि अर्पितों तुला हा सेवुनि हो समरदेवते शांत
यासम अभद्र मानव पुनरपि निपजो न आर्यदेशांत' ३७०
ऐशा मंत्रोच्चारें दिधली भीमाहुती चिताकुंडीं
नाचों लागति तेव्हां आनंदें प्रेक्षकांचिया झुंडी ३७१
वाजविती बहु टाळया झाल्या चारी दिशा निनादमय
भासे खलमरणाचा नृपसुतजन्मोत्सवापरी समय ! ३७२
पडतांच वन्हिवदनीं होरपळे भीमदेह निमिषांत
रक्षा पाहुनि त्याची सकलांचे नेत्र जाहले शांत ३७३
बघवे न दुश्चरित तें सविता अस्तासि जाय त्या कालीं
निर्मल सृष्टिमुखावर तिमिरमिषें गाढ कालिमा आली ३७४
मग ते पुरवासी जन करिते झाले प्रवेश नगरांत
भस्मीभूत अशा त्या दांपत्याचे गुणावगुण गात ३७५
नित्य क्रमानुसारें सारे निजकार्यसेवनीं गढले
विस्मरण या कथेचें कांहीं दिन लोटल्यावरी पडलें ३७६
रक्षा कधींच गेली भीमतनूची उडून दूरवर
मागें एकहि नुरला स्नेहि, सखा, आप्त, बंधु, सप्रवर. ३७७
परि सांप्रदाय त्याचा चालविती अमित शिष्यजन अजुनी
'वाणीविरुद्ध करणी' हेंच सकलशास्त्र-सार समजोनी ! ३७८
शब्दींच शौर्य दाविति अंगीं त्याचा शतांशही न वसे
नभिं गडगडाट करिती ग्रीष्मऋतूंतील शुष्क मेघ जसे. ३७९
'मी शूर' 'मी शहाणा' करुनि अशी नित्य वल्गना नुसती
समयीं भ्याड पहा ते कांतेमागें लपूनियां बसती ! ३८०
देव नको, धर्म नको, देश नको, स्वार्थ मात्र एक रुचे;
अर्पण असो अशांच्या चरणीं अद्भुत चरित्र तद्रुरुचें. ३८१